| वर्ष - 7 | अंक - 142 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

गणपती बाप्पा मोरया
पुढच्या वर्षी लवकर या...!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 28 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर

# पिंपरी चिंचवडमध्ये चोख बंदोबस्त!

### पोलिसांचा फौजफाटा तैनात: मिरवणूकी दरम्यान प्रत्येक मंडळाचे होणार 'व्हिडीओ रेकॉर्डींग'

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरामध्ये गणेशोत्सव सणानिमित्त अनंत चतुर्दशी दिवशी सार्वजनिक व घरगुती गणपतींचे विसर्जन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त यांच्या देखरेखीखाली चोख बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.**

पिंपरी चिंचवड पोलीस दलाकडून ०५ पोलीस उप आयुक्त, ०८ सहायक पोलीस आयुक्त, ५९ पोलीस निरिक्षक, १७७ सपोनि / पोउप-नि १८५० पोलीस अंमलदार, २३९ होमगार्ड, ०१ एसआरपीएफ कंपनी, ०४ आरसीपी, १८ स्ट्रायकिंग व १६८ ट्राफिंग वॉर्डन असा एकूण २५० अधिकारी व २३५७ अंमलदार यांची बंदोबस्तकामी नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच पुरेसा राखीव बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.



पिंपरी चिंचवड शहरामध्ये विसर्जन मिरवणूकीदरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न होवू नये याकरीता शहर पोलीस दलाकडून गणेशोत्सव दरम्यान संवेदनशील भागामध्ये व मिश्र वस्तीमध्ये पथ संचलन करण्यात आलेले आहे. तसेच विसर्जन मार्गावर व प्रत्येक विसर्जनाची ठिकाणे सीसीटिव्ही निगराणीखाली ठेवण्यात आलेली आहेत. गुन्हे शाखेकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारावर १३१३ प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. विसर्जन मिरवणूक दरम्यान चोरी पाकिटमारी होवू नये याकरीता गुन्हे शाखेकडून ०५ पथके तैनात करण्यात आली आहेत. शहरातील विविध मिरवणूक मार्गाची घातपात विरोधी तपासणी करण्यात आलेली असून, ध्वनी प्रदुषण करणा-या मंडळाचे नॉईज लेव्हल मिटरव्दारे रिडिंग घेण्यासाठी पथके तयार करण्यात आलेली आहेत. मिरवणूकी दरम्यान प्रत्येक सार्वजनिक मंडळाचे व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड आयुक्तालय अंतर्गत येणा-या विसर्जन स्थळासह ८९ नैसर्गिक ठिकाणांव्यतिरिक्त १० कृत्रिम तलावाची महापालिकेतर्फे व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्या प्रत्येक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. प्रमुख विसर्जनाच्या ठिकाणी ध्वनीक्षेपक यंत्रणेसह तात्पुरते नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच वाहतूक पोलीस विभागाकडून वाहतूकीचे योग्य नियमन करणेकरीता चोख उपाययोजना करण्यात आलेली आहे.

### ईद-ए-मिलाद सणाचे आयोजन

दरम्यान पिंपरी चिंचवड शहरामध्ये ईद-ए-मिलाद सण साजरा करण्यात येणार असून त्या निमित्ताने शहरात विविध ठिकाणी मिरवणूकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी कायदा व सुव्यवस्था राखणेकामी देखील चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन करण्यात आलेले आहे.

---

# कलाउपासक कलाकारांमुळे पिंपरी-चिंचवडचा लौकीक!

### शंकर जगताप यांचे मत : कलाकार सुधाकर शिंदे यांच्या कार्याचा सन्मान

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात अनेक क्षेत्रात पारंगत व्यक्ती आहेत. कलाउपासक कलाकारांमुळे शहराचा लौकीक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढला आहे. कलाउपासकांना हक्काचे व्यासपीठ मिळाले पाहिजे, असे मत भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**

पिंपळे गुरव येथील प्रतिभावंत कलाकार सुधाकरजी शिंदे यांनी "पर्यावरणपुरक गणेशोत्सव..." असा संदेश देत कलकत्ता येथील बेलूर मठाची हुभेहूब प्रतिकृती तयार केली आहे. तसेच, कागदाच्या लगद्यापासून मनमोहक श्रीगणेश मूर्ती साकारली आहे. त्यांच्या निवासस्थानी जगताप यांनी भेट दिली आणि श्रींचे दर्शन घेतले. यावेळी भाजपाचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी नगरसेवक सागर आंघोळकर उपस्थित होते. तसेच, शिंदे यांचा सन्मानही केला.



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्याहस्ते पुरस्कारप्राप्त कलाकार सुधाकर शिंदे यांनी पिंपरी येथील जयहिंद हायस्कूलमध्ये तब्बल ३६ वर्षे सेवा बजावली आहे. बेलूर मठाच्या प्रतिकृतीसाठी त्यांची 'वर्ल्ड बूक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नोंद झाली आहे. पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयाचे ते विद्यार्थी असून, १९७४ पासून कला क्षेत्रात सेवा करीत आहेत. त्यांना जिल्हा अध्यापक पुरस्कारासह आतापर्यंत विविध पुरस्कार मिळाले आहेत. जुन्या काळात पुणे-पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक गणेशोत्सवांत आकर्षक देखावे उभारण्यात त्यांचा हातखंडा होता. सीता अग्निप्रवेश, ताजमहाल, दिलवाडाचे जैन मंदिर, १६ फुटी नटराज आदी देखाव्यांनी प्रेक्षकांची दाद मिळवली होती.

> "पर्यावरण हाच नारायण" या सदगुरू वामनराव पै यांच्या विचाराने प्रेरणीत होऊन कलाकार सुधाकर शिंदे कला क्षेत्रात काम करीत आहेत. स्वामी विवेकानंद यांचे गुरू रामकृष्ण परमहंस यांनी या मठाची स्थापना केली होती. त्याची हुबेहूब प्रतिकृती त्यांनी साकारली आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांचा जीवनप्रवास जवळून पाहिलेल्या शिंदे यांच्या भेटीने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. त्याचा पर्यावरणपुरक गणेशोत्सवाचा कृतीशील पुढाकार पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांसाठी आदर्शवत आहे.
>
> – **शंकर जगताप,**
> **शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# पादचारी पुलावर पडणार हातोडा!

## कोंडी सोडविण्यासाठी 2014 मध्ये उभारला होता मार्ग

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नगर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी प्रस्तावित उड्डाणपूल आणि समतल विलगकांना (ग्रेडसेप्रेटर) पादचारी उन्नत मार्गाचा (फूट ओव्हर ब्रीज) अडथळा ठरणार असल्याने पादचारी उन्नत मार्ग काढण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.**



विशेष म्हणजे नगर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठीच २०१४ मध्ये पादचारी मार्ग उभारण्यात आला होता. मात्र आता त्याचा अडथळा ठरत असल्याचा साक्षात्कार महापालिकेला झाला आहे. त्यामुळे पादचारी मार्ग उभारण्यासाठी केलेला खर्च वाया जाणार असून महापालिकेच्या दोन विभागातील समन्वयाचा अभावही अधोरेखित झाला आहे. नगर रस्त्यावरील वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. मेट्रो मार्गिकेची कामे आणि बीआरटी मार्गामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींकडून केला जात आहे. त्यामुळे नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले असून, त्याअंतर्गत उड्डाणपूल आणि समतल विलगकांची उभारणी करण्याचे नियोजित आहे. त्याबाबतची निविदा प्रक्रिया येत्या काही दिवसांत अंतिम करण्यात येणार आहे. मात्र, उड्डाणपूल आणि समतल विलगकांच्या नियोजनात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला विश्रांतवाडी चौकातील पादचारी उन्नत मार्ग अडथळा ठरत असल्यामुळे तो पाडण्याचा विचार सुरू झाला आहे. प्रस्तावित उड्डाणपूल आणि समतल विलगकांमुळे वाहतूक कोंडी ८० टक्क्यांनी कमी होईल, असा दावा महापालिकेच्या वाहतूक नियोजन विभागाकडून करण्यात आला आहे. विश्रांतवाडी चौक हा वर्दळीचा चौक आहे. आळंदी, पुणे विमानतळ, धानोरी येथील रस्ते या चौकात एकत्र येतात. त्यामुळे या चौकात सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने पादचाऱ्यांसाठीही रस्ता ओलांडणे धोकादायक ठरत होते. त्यामुळे २०१४ मध्ये ६ कोटी ३८ लाख रुपये खर्च करून पादचाऱ्यांच्या सुविधेसाठी पादचारी उन्नत पूल उभारण्यात आला. मात्र, नव्या वाहतूक आराखड्यात कोट्यवधी रुपयांचा पादचारी पूल अडथळा ठरत असल्याची उपरती महापालिकेला झाली आहे. हा पूल पाडण्याचे नियोजित असल्याने पादचाऱ्यांनाही गैरसोयीला जावे लागण्याबरोबरच महापालिकेची दूरदृष्टीबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विश्रांतवाडी चौकातील पादचारी उन्नत पुलाची रचना त्यावेळची परिस्थिती लक्षात घेऊन करण्यात आली होती. विश्रांतवाडी आणि परिसरातील वाहनांची संख्या आणि लोकसंख्या पाहता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उड्डाणपुलाची आवश्यकता आहे. चौक ओलांडण्यासाठी केवळ पादचारी पूल हा व्यवहार्य पर्याय ठरत नाही. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणातूनही ही बाब स्पष्ट झाली आहे. त्याचा अपेक्षित वापरही होत नसल्याचे दिसून येत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कालबाह्य सुविधांऐवजी नव्या सुविधा द्याव्या लागणार आहेत, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

> नगर रस्त्यावरील विश्रांतवाडी चौक प्रमुख आहे. उड्डाणपूल आणि समतल विलगक, भुयारी मार्गांमुळे वाहतूक कोंडी कमी होणार आहे. या सुविधा उभारण्यासाठी पादचारी पूल काढावा लागण्याची शक्यता आहे. विश्रांतवाडी चौकातून लोहगावकडे जाणारा उड्डाणपूल इंग्रजी वाय या आकाराचा असून त्यासाठी हा पूल अडथळा ठरत आहे.
>
> **-अजय वायसे,** कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग, पुणे महापालिका

# महिला विधेयकामुळे महिलांना विकासात सक्रिय सहभाग!

## आरक्षणामुळे राजकारणात नवीन महिला दिसतील : डॉ. नीलम गोऱ्हे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्त्रीयांना मनुष्य म्हणून धोरण प्रक्रियेत सहभागी होता यावे यासाठी आणलेले महिला विधेयक स्वागतार्ह असुन त्याबाबत समाजात प्रचार व प्रसार गरजेचा आहे असे ऊपसभापती विधानपरिषद तथा स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. स्त्री आधार केंद्रातर्फे जागतिक महिला हिंसाचार विरोधी दिनानिमित्त महिला आरक्षण विधेयकाचे स्वागत आणि त्याबाबत खुली चर्चा या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी सहाय्यक समिती, फर्ग्युसन रस्ता, पुणे येथे करण्यात आले.**



यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती तथा स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे बोलत होत्या. याप्रसंगी माजी आमदार दीप्ती चवधरी, माजी नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे, माजी नगरसेविका रूपाली ठोंबरे पाटील, चंद्रकांता सोनकांबळे, निवृत्त माहिती संचालक श्रद्धा बेलसरे, स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त जेहलम जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, समाजातील सर्वच घटकांतील स्त्रियांना आरक्षण मिळाल पाहिजे. महिला विधेयक मंजूर केल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत डॉ. गोऱ्हे यांनी केले. आरक्षणाचा लाभ हा अनुसूचित जाती जमातीमधील स्त्रियांना देखील लागू असल्याचे त्यांनी नमूद केले. १९३५ साली सरोजिनी नायडू यांनी महिला आरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम मांडला असल्याचे त्यांनी सांगितले. आरक्षणामुळे आगामी काळात राजकारणात नवीन महिला दिसतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महिलांनी आरक्षणाच्या अंमलबजावणीकरिता समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यावर त्यांची संख्या देखील वाढू शकते अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. आरक्षणाच्या निमित्ताने राजकारणात जनमताची दखल घेतली गेली असल्याचे त्यांनी सांगितले. माजी महापौर दीप्ती चवधरी म्हणाल्या, सरकारने महत्वाचे पाऊल टाकलेले आहे. इतर मागासवर्गीय जातीच्या आरक्षणामुळे त्यांना स्वतःला महापौर पदावर काम करता आल्याचे त्यांनी सांगितले. महिलेला प्रत्यक्ष काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. महिला आरक्षणाबाबत स्त्रियांमध्ये जागृती केली पाहिजे. माजी नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे म्हणाल्या, महिला आरक्षण मिळाले असले तरी त्यासाठी अभ्यास व परिश्रम यातुन महिलांनी गुणवत्ता वाढवली पाहिजे. आरक्षणाच्या निर्णयामुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. स्त्रियांनी धाडस केले पाहिजे. केंद्रात स्थिर सरकार असल्याने महिला शक्ती वंदन विधेयक आणणे सरकारला शक्य झाले. माजी नगरसेविका रुपाली ठोंबरे पाटील म्हणाल्या, स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकारणात सहभागी होणे आवश्यक आहे. आरक्षणाबाबत श्रेय वादाचा विषय येत नाही महिलांना आरक्षण मिळाले हे महत्वाचे आहे. स्त्रियांची ताकद दाखवण्यासाठी स्त्रियांनी एकत्र येण्याची गरज आहे. महिला आरक्षणाची अंमलबजावणी लवकर होणे गरजेचे आहे.

### स्त्रियांना आरक्षण मिळाले पाहिजे

» समाजातील सर्वच घटकांतील स्त्रियांना आरक्षण मिळाल पाहिजे. महिला विधेयक मंजूर केल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत डॉ. गोऱ्हे यांनी केले. आरक्षणाचा लाभ हा अनुसूचित जाती जमातीमधील स्त्रियांना देखील लागू असल्याचे त्यांनी नमूद केले. १९३५ साली सरोजिनी नायडू यांनी महिला आरक्षणाचा मुद्दा सर्वप्रथम मांडला असल्याचे त्यांनी सांगितले. आरक्षणामुळे आगामी काळात राजकारणात नवीन महिला दिसतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महिलांनी आरक्षणाच्या अंमलबजावणीकरिता समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यावर त्यांची संख्या देखील वाढू शकते अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. आरक्षणाच्या निमित्ताने राजकारणात जनमताची दखल घेतली गेली असल्याचे त्यांनी सांगितले.डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या

## चिखली- नेवाळे वस्तीतील ‘त्या’ रस्त्याला अखेर ‘गती’

# स्थानिकांची परवड थांबणार!

### भूमिपूत्र मोरे कुटुंबियांनी जपली सामाजिक बांधिलकी

**भाजपा आमदार महेश लांडगे यांची यशस्वी मध्यस्थी**

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली- नेवाळेवस्ती येथील जयहरी हाऊसिंग सोसायटीसमोरील रस्त्याचा मार्ग अखेर मोकळा झाला. त्यामुळे २० वर्षांपासून स्थानिक रहिवाशांची होणारी परवड थांबली असून, याकामी जागा मालक मोरे कुटुंबियांनी भूसंपादनासाठी सामाजिक बांधलकी जपत सकारात्मक पुढाकार घेतला. विशेष म्हणजे, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जागा मालक आणि रहिवाशी यांच्यामध्ये यशस्वी मध्यस्थी केली. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**



चिखली- नेवाळेवस्ती येथील गट नंबर १२४४ येथील जयहरी हाऊसिंग सोसायटीसमोरील रस्त्याचा प्रश्न प्रलंबित होता. यासाठी स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांनी वारंवार महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करावा केला. विद्यार्थी- गृहिणी यांना चिखलातून मार्ग काढत शाळा- मार्केटमध्ये जावे लागत होते.

गेल्या सहा महिन्यांपासून स्थानिक नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांना हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा तगादा लावला होता.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी जागा मालक माजी नगरसेवक गिताराम मोरे, बाळासाहेब मोरे, पांडुरंग मोरे, जालिंदर मोरे, काळुराम मोरे, सोपान मोरे, अनिल मोरे, गोरख मोरे, तन्मय मोरे आणि प्रकाश मोरे यांच्यासोबत चर्चा केली आणि नागरिकांच्या सोयीसाठी पुढाकार घेण्याबाबत विनंती केली. गिताराम मोरे आणि सर्व जागा मालकांनी सामाजिक कार्य म्हणून सकारात्मक निर्णय घेतला. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला, अशी माहिती जयहरी हाऊसिंग सोसायटीचे चंद्रकांत शेवते यांनी दिली.

> “ जागामालक आणि प्रशासन यांच्यातील सकारात्मक समन्वयाअभावी अनेक ठिकाणी रस्त्यांचा प्रश्न आहे. चिखली-नेवाळे वस्ती येथील सुमारे दीड हजार नागरिकांना गेल्या २० वर्षांपासून रस्त्याची प्रतिक्षा होती. याबाबत मोरे कुटुंबियांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श समोर ठेवून रस्त्याच्या कामासाठी सकारात्मक पुढाकार घेतला. त्यामुळे हा प्रश्न कायमस्वरुपी निकालात निघाला आहे. मोरे कुटुंबियांचे खऱ्या अर्थाने योगदान आहे.
>
> - महेश लांडगे,
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

---

# पिंपरी चिंचवडला भारत सरकारचा “गव्हर्नन्स” पुरस्कार प्रदान

### केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांचा सन्मान

**इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्डमध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सारथी ॲप देशात दुसरे तर राज्यात प्रथम**

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत सरकारच्या इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्डमध्ये “गव्हर्नन्स” श्रेणीत पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीच्या स्मार्ट सारथी ॲपने देशात दुसरे स्थान पटकाविले. याबद्दल इंदौर (मध्यप्रदेश) येथे झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांना सन्मान चिन्ह व पुरस्कार प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, स्मार्ट सारथी ॲप प्रकल्प प्रमुख अंकीत भार्गव हे देखील उपस्थित होते.**



इंदौर (मध्यप्रदेश) येथे बुधवार, दि. २७ सप्टेंबर रोजी इंडिया स्मार्ट सिटीज प्रोजेक्ट अवॉर्ड कार्यक्रमात केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार राज्यमंत्री कौशल किशोर, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्यपाल मंगुभाई पटेल, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाचे (MOHUA) सचिव मनोज जोशी, भारत सरकारच्या स्मार्ट सिटी मिशनचे सहसचिव आणि मिशन संचालक कुणाल कुमार यांच्यासह विविध स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विविध मान्यवर उपस्थित होते. देशभरातील ८० पात्रताधारक शहरांमधून पिंपरी चिंचवडला “गव्हर्नन्स” पुरस्कार प्राप्त झाला आहे. पिंपरी चिंचवडने देश पातळीवरील दुसरे तर राज्यात पहिल्या क्रमांकाचे यश संपादन केले. हे यश म्हणजे पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी एक गौरवाची बाब असून पुन्हा एकदा शहराच्या लौकीकात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी भावना आयुक्त शेखर सिंह यांनी पुरस्कार मिळाल्यानंतर व्यक्त केली.

> “ शहरी विकासात एक आदर्श बदल साध्य करण्याच्या ध्येयाकडे या मिनशद्वारे महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. पीसीएमसी स्मार्ट सारथी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सध्या सुमारे २ लाख वापरकर्ते ॲप, वेब पोर्टल आणि सोशल मीडिया चॅनेलद्वारे संवाद साधत आहेत. पिंपरी चिंचवडने देश पातळीवरील दुसरा तर राज्यात पहिला क्रमांकाच्या पुरस्कारासाठी नाव कोरल्याने शहरवासियांसाठी ही एक गौरवाची बाब असून पुन्हा एकदा शहराच्या लौकीकात मानाचा तुरा रोवला गेला आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी.




# प्रामाणिक न्यायाधीशांचा गौरव करू!

**चेन्नईस्थित 'मद्रास उच्च न्यायालया'ला तेथील न्यायाधीश आनंद व्यंकटेश यांचा अभिमान वाटला पाहिजे. या न्या. व्यंकटेश यांनी तमिळनाडूचे विद्यमान उच्च शिक्षण मंत्री आणि सत्ताधारी द्रमुकचे नेते के. पोन्मुडी यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांचा खटला पुन्हा चालवण्याचा निर्णय नुकताच स्वतःहून (स्युओ मोटो) घेतला.**

आणि त्याआधी याच महिन्यात, याच न्यायाधीशांनी तमिळनाडूतील आणखी दोघा मंत्र्यांवरील 'उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांपेक्षा अधिक संपत्ती जमवल्या'चे खटलेही पुन्हा चालवण्याचा आदेश दिला. हे तिघेही मंत्री खालच्या न्यायालयांत याच खटल्यांमधून सहीसलामत सुटले होते! पोन्मुडी यांच्यावरील खटला तर मुळात विळुपुरमच्या जिल्हा न्यायालयात चालवला जाणार होता, पण मद्रास उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय विभागातून हा खटला वेल्लोरच्या जिल्हा न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला. जिल्ह्याच्या मुख्य न्यायाधीशांच्या न्यायालयाने पोन्मुडी यांना कोणत्या कारणांस्तव दोषमुक्त केले, हे उघड झालेले नाही. तो निर्णय 'नैसर्गिक न वाटणाऱ्या वेगाने' झाला, असे न्या. व्यंकटेश नमूद करतात. तर तमिळनाडूचे महसूलमंत्री के. के. एस. एस. आर. रामचंद्रन आणि तेथील अर्थमंत्री थंगम तेनरासु यांना विरुधुनगर जिल्ह्यातील विळिपुतुर येथील विशेष न्यायालयाने दोषमुक्त



केले, त्यांच्यावरील आरोप आधीच्या (अण्णा द्रमुकच्या) सरकारने ठेवलेले होते. हा खटला महिनोनमहिने रेंगाळला- इतका की, या दोघाही मंत्र्यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान मिळालेच आणि त्यांच्यावरील आरोपांचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्याही बदल्या होऊन, आधीच्या तपासाची झाकपाक करणाऱ्या अधिकाऱ्यांना वाव मिळाला! आता या तिघांवरील खटल्यांचा फेरविचार होणार, हे चांगलेच; पण यातून आपण-भारताच्या नागरिकांनी काय बोध घ्यायचा? 'सत्यमेव जयते' असे ब्रीद असणाऱ्या आपल्या देशात 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेचा अर्थच पालटून सत्ताधाऱ्यांच्या बाजूचे ते सत्य मानले जाणार आहे का? तसे होणे भयावहच आहे, हा नागरिकांचा आक्रोश कोण ऐकणार आहे? राहुल गांधींवरील खटल्यात काय झाले याकडेही जरा बारकाईने पाहा. बालिशपणे केलेल्या एका पाचकळ विनोदावरून हा खटला सुरतच्या जिल्हा न्यायालयात गुदरला गेला. तेथील मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे तो सुनावणीस आला. पण मध्यंतरीच्या काळात अहमदाबाद येथील 'गुजरात उच्च न्यायालया'त जाऊन, या खटल्यास स्थगिती मिळवण्याचे प्रयत्न झाले आणि ती दिलीसुद्धा गेली, पण बऱ्याच महिन्यांनंतर, सुरतच्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांची बदली झाल्यावर मात्र उच्च न्यायालयाकडून ही स्थगिती उठवली गेली... खटल्याचे कामकाज सुरूही झाले. सुरतचा तो निकाल साऱ्यांनाच माहीत आहे. फार विचार न करता केलेल्या एका फालतू विनोदी टिप्पणीपायी राहुल गांधी यांना दोन वर्षांची कैद सुनावण्यात आली. ज्या खासदारांना किमान दोन वर्षांची कैद होते त्यांना लोकसभेचे सदस्य राहाता येत नाही, म्हणून राहुल गांधी यांनी सदस्यत्व गमावले. या प्रकरणी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली तेव्हा मात्र 'गुजरात उच्च न्यायालयात हे काय चालले आहे?' असे तिखट मत व्यक्त केले. यातून राहुल गांधींना मिळायचा तो धडा मिळाला असेल आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांबद्दल शब्दांचे बुडबुडे उडवताना अतिउत्साह दाखवल्यास कसा त्रास होतो हेही राहुल यांना उमगले असेल. पण मुद्दा तो नाही. प्रश्न असा आहे की, वरील सर्व उदाहरणांतून आपण आपल्या देशातील न्यायव्यवस्थेच्या सद्यःस्थितीबद्दल काय निष्कर्ष काढणार आहोत? तीन मंत्र्यांवरील खटल्यांचे उदाहरण तमिळनाडूतले, तेथे 'इंडिया' आघाडीचा घटक पक्ष असलेल्या एका पक्षाची सत्ता आहे; तर दुसरे तर एका खासदारावरील खटल्याचे उदाहरण गुजरातमधले, जिथे 'डबल इंजिन सरकार' सत्तेवर आहे. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व्यंकटेश यांनीच त्यांच्या आदेशात वापरलेल्या शब्दांत सांगायचे तर 'गुन्ह्यांचे खटले निष्प्रभ करण्यासाठी राजकीय सत्तास्थानी असलेल्यांकडून योजनापूर्वक प्रयत्न होत असल्याचे दिसणे अस्वस्थ करणारे आहे'. ज्या राज्यात ज्या पक्षाची सत्ता आहे, त्याचा प्रभाव त्या राज्यामधील काही न्यायाधीशांवर पडू शकतो, असे यातून समजावे काय? अशा प्रश्नांमुळे व्यथित होऊनही जर या देशाचे नागरिक निव्वळ 'न्यायालयाचा अवमान' होईल या भीतीपायीच निमूट राहून न्यायालयीन नैतिकतेचा हा अनादर सहन करू लागले असतील, तर या देशाच्या भवितव्याबद्दल रास्त चिंताच व्यक्त केली पाहिजे.

## संपादकीय »

# ताशेऱ्यांची तडतड!

***सर्वोच्च न्यायालय जिची अपेक्षा करते ती सदसद्विवेकबुद्धी राज्य सरकारकडे शाबूत असती तर शिक्षिकेने करवलेल्या मारहाणप्रकरणी सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घ्यावी लागली नसती..***

उत्तर प्रदेशातील शाळेत एका शिक्षिकेने वर्गातील मुसलमान विद्यार्थ्यांस इतर विद्यार्थ्यांकरवी मारलेल्या थपडांचे वळ त्या विद्यार्थ्यापेक्षा आपल्या गुरू-शिष्य परंपरा, 'भेदाभेद अमंगळ'ची शिकवण आणि कायद्यासमोर सर्व समान असल्याची बतावणी यावर अधिक पडलेले आहेत. या पार्श्वभूमीवर "या घटनेने उत्तर प्रदेश सरकारच्या सदसद्विवेकबुद्धीस खडबडून धक्का बसायला हवा", ही सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली अपेक्षा न्यायाधीशांस अपेक्षित असलेले आणि प्रत्यक्षात असलेले जग यातील तफावत दर्शवते. म्हणजे इतक्या मूलभूत आणि माणुसकीविषयक मुद्द्यासाठीदेखील सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतात हे यातून दिसून येते. वास्तविक यातील प्रतिवादी उत्तर प्रदेश सरकारने गांधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर आपली भूमिका मांडणे शहाणपणाचे ठरले असते.

**भाजपला गेल्या नऊ वर्षांत व्यापक जनाधार मिळाला असला तरी दक्षिण भारतात कर्नाटकवगळता पाळेमुळे रोवता आलेली नाहीत. पाचच महिन्यांपूर्वी कर्नाटकची सत्ताही भाजपला गमवावी लागली. कर्नाटकात विधानसभेची लोकसभा निवडणुकीत पुनरावृत्ती टाळण्यासाठी अलीकडेच, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या धर्मनिरपेक्ष जनता दलाशी भाजपने हातमिळवणी केली.**

# भाजपला मित्र का सोडून जातात ?

दक्षिणेत एक नवीन मित्र जोडल्याचे समाधान असतानाच, तमिळनाडूत अण्णा द्रमुकने भाजपशी काडीमोड घेण्याचा निर्णय जाहीर केला. तमिळनाडूत भाजपला अद्यापही पक्षविस्तार करणे शक्य झालेले नाही. तमिळनाडूत दोन वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत अण्णा द्रमुकसह युतीत भाजपचे चार आमदार निवडून आले होते. पण वर्षभरापूर्वी तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवताना भाजपला सहा टक्क्यांच्या आसपास मते मिळाली. तरीही पंतप्रधान व गृहमंत्री तमिळनाडूबाबत आशावादी दिसतात. वाराणसीतील तमिळ संगम, नवीन संसद इमारतीत लोकसभा सभागृहात चोल साम्राज्याचे प्रतीक असलेला सेन्गोल राजदंडासारखा बसविणे, संसद इमारतीच्या उद्घाटनाला तमिळ पुजारी, परदेश दौऱ्यात मोदी यांनी भाषणाची सुरुवात 'वणक्कम'ने करणे यातून तमिळ जनतेची मने आणि मते जिंकण्याचा प्रयत्न अधोरेखित होतो. तमिळनाडूत यश मिळवायचे असल्यास



अण्णा द्रमुकची साथ हवी हे भाजपचे धोरण होते. मध्यंतरी इंडिया आघाडीला शह देण्याकरिता भाजपने एनडीए घटक पक्षांची बैठक घेतली तेव्हा अण्णा द्रमुकचे सरचिटणीस पलानीस्वामी यांना मोदी यांच्याबरोबरीने बसवण्यात आले होते. बाकी सर्व घटक पक्षांचे नेते मागील रांगेत होते. पण तमिळनाडू भाजपचे प्रदेशाध्यक्ष अन्नामलाई यांनी दिवंगत अण्णा दुराई, जयललिता आदी नेत्यांवर वारंवार टीकाटिप्पणी केल्याने अण्णा द्रमुकने युती तोडली. तमिळनाडूतील प्रदेशाध्यक्षांमुळे अण्णा द्रमुकसारखा जुना मित्र भाजपने गमावला आहे. दिल्लीच्या आशीर्वादाशिवाय हे प्रदेशाध्यक्ष एवढी टोकाची भूमिका मांडणे कठीणच दिसते. शिवसेना, पंजाबमध्ये अकाली दल, बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीशकुमार यांचा जनता दल, गोव्यात महाराष्ट्रवादी गोमांतक पक्ष असे अनेक लहानमोठे मित्र पक्ष भाजपच्या कपटी राजकारणामुळे सोडून गेले. त्यात आता अण्णा द्रमुकची भर पडली आहे. आधी भाजपला साथ देणारे तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समितीनेही नंतर भाजपपासून दूर राहणे पसंत केले. पक्ष वाढीसाठी मित्रपक्षांची मदत घ्यायची आणि नंतर ते पक्ष कमकुवत करायचे हे भाजपचे धोरण. २८ पक्षांच्या इंडिया आघाडीचे आव्हान उभे ठाकताच भाजपने ३८ लहान-मोठ्या पक्षांची मोट बांधून 'एनडीए' बळकट असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. नऊ वर्षांत प्रथमच मित्रपक्षांना एकत्र जमविण्यात आले याचाच अर्थ भाजपला 'इंडिया' आघाडीचे आव्हान वाटत असावे. अण्णा द्रमुकसारखा जुना मित्र केवळ प्रदेशाध्यक्षांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे सोडून गेल्याने भाजपलाच मित्र नकोसे झाले असावेत, असा अर्थ काढला जाऊ शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बहीण संकटत भाऊ धावून जाणार!

## » वैद्यनाथ साखर कारखाना वाचविण्यासाठी धनंजय मुंडेंचा पुढाकार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजप नेत्या पंकजा मुंडे या सध्या प्रचंड आर्थिक अडचणीत आहेत. पंकजा यांच्या वैद्यनाथ साखर कारखान्याला जीएसटी विभागाकडून जप्तीची नोटीस पाठवण्यात आली. कारखान्याने तब्बल 19 कोटींचा जीएसटी कर चुकवला नसल्याचे नोटीसमध्ये सांगितले गेले.**

दरम्यान, बहिणीच्या अडचणीच्या काळात भाऊ धनंजय मुंडे हे संकटमोचक बनणार असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे. वैद्यनाथ साखर कारखान्याला जीएसटी विभागाची ही फक्त नोटीस नसून कारवाईच आहे, असे खुद्द पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे. आपल्याला अडचणींच्या काळात केंद्र सरकारकडून मदत मिळाली नाही. इतर सर्व साखर कारखान्यांना मदत मिळाली. केवळ आपल्या कारखान्यांना मदत मिळाली नाही, असं म्हणत पंकजा यांनी नाराजी देखील व्यक्त केली. या सर्व घडामोडींनंतर आता पंकजा यांच्या मदतीसाठी त्यांचे भाऊ मंत्री धनंजय मुंडे धावून जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. पंकजा मुंडे यांचा कारखाना वाचवण्यासाठी भावाने कंबर कसली आहे. कारखाना वाचवण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे मार्गदर्शन करणार आहेत. कारखान्याकडून सरकारला प्रस्ताव पाठवण्याबाबत सांगण्यात येणार आहे. या विषयावर धनंजय मुंडे स्वत: पंकजा मुंडे यांच्याशी चर्चा करणार आहेत.



वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना वाचवण्यासाठी धनंजय मुंडे यांच्याकडून प्रयत्न केले जात असल्याची माहिती देखील समोर येत आहे. छत्रपती संभाजीनगरच्या जीएसटी आयुक्तांनी पंकजा मुंडे यांना त्यांच्या कारखान्याचा 19 कोटींचा जीएसटी कर थकवल्याप्रकरणी वसुली आणि जप्तीची नोटीस पाठवली आहे. याच पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे पुढाकार घेणार असल्याची माहिती मिळत आहे. प्रशासकीय स्तरावर कारखान्यासाठी काय केलं पाहिजे, याबाबत धनंजय मुंडे कारखान्याचे पदाधिकारी आणि पंकजा मुंडे यांना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती आहे. धनंजय मुंडे स्वत: आज किवा उद्या पंकजा मुंडे यांच्याशी या मुद्यावर चर्चा करणार आहेत. धनंजय मुंडे हे सुद्धा गेल्या काही काळापासून वैद्यनाथ साखर कारखान्याशी जोडले गेले आहेत. त्यांच्या भावना सुद्धा या कारखान्याशी जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे हा कारखाना वाचवण्यासाठी प्रयत्न करणे, याला त्यांच्या व्यावसायिक दृष्टीकोनापेक्षा भावनिक कारण जास्त मानले जात आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांच्या मदतीला धनंजय मुंडे धावून जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

### धनंजय मुंडे अशी करु शकतील मदत

» संभाजीनगरच्या जीएसटी आयुक्तांनी पंकजा मुंडे यांना त्यांच्या कारखान्याचा 19 कोटींचा जीएसटी कर थकवल्याप्रकरणी वसुली आणि जप्तीची नोटीस पाठवली आहे. याच पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे पुढाकार घेणार असल्याची माहिती मिळत आहे. प्रशासकीय स्तरावर कारखान्यासाठी काय केलं पाहिजे, याबाबत धनंजय मुंडे कारखान्याचे पदाधिकारी आणि पंकजा मुंडे यांना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती आहे. धनंजय मुंडे स्वत: आज किवा उद्या पंकजा मुंडे यांच्याशी या मुद्यावर चर्चा करणार आहेत. धनंजय मुंडे हे सुद्धा गेल्या काही काळापासून वैद्यनाथ साखर कारखान्याशी जोडले गेले आहेत.

# कांदा संप सुरूच!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

कांद्याच्या दराच्या मुद्द्यावरून राज्यातील व्यापारी आणि सरकारमध्ये वाद सुरू आहेत. काल मुंबईत झालेली बैठक अनिर्णित ठरली होती. त्यात केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी त्यांची एकही मागणी ऐकली नसल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. एकही समन्वय समिती स्थापन झाली नाही. मात्र पुढील चर्चा करण्यासाठी सरकार आणि प्रतिनिधी 29 सप्टेंबर रोजी दिल्लीत भेटतील. नाफेड आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एनसीसीएफ) यांच्यामुळे संपूर्ण बाजारपेठ कोलमडून पडल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. या दोन्ही एजन्सी जाणीवपूर्वक कांद्याचे बाजारातील भाव कमी करत आहेत. तर दुसरीकडे कांद्यावर 40 टक्के निर्यात शुल्क लागू केल्याने व्यवसायाचे कंबरडे मोडले आहे. नाशिकच्या कांदा बाजारातील संप सुरूच आहे. यामुळे सुमारे 20 मोठ्या बाजारातील पाचशेहून अधिक व्यापाऱ्यांनी कांद्याचे लिलाव थांबवले आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे कांदा उत्पादक राज्य असून नाशिक हे महाराष्ट्रातील कांदा लागवडीचे गड आहे. लासलगाव येथे आशियातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ आहे. त्यामुळे येथे आठ दिवस कांद्याचा लिलाव न होणे विशेषतः महाराष्ट्र सरकारसाठी चिंतेचे कारण आहे. 26 सप्टेंबर रोजी मुंबईत झालेल्या बैठकीत केंद्रीय मंत्री पियुष गोयल, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. नाफेड आणि एनसीसीएफ महाराष्ट्रातून कांदा खरेदी करून इतर राज्यांच्या बाजारात स्वस्त दरात विकत असल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे दरात घट झाली आहे. बाजारावर जाणीवपूर्वक प्रभाव टाकणे योग्य नाही. सरकारच्या या धोरणामुळे येथील व्यापारी आणि शेतकरी दोघांचे नुकसान होत आहे. ना शेतमालाला भाव मिळत आहे ना व्यापाऱ्यांना नफा. त्यातच सरकारने कांद्यावर 40 टक्के निर्यात शुल्क लावले आहे. त्यामुळे निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे. देशांतर्गत बाजारात भाव घसरले आहेत.

# आज ईद ए मिलादनिमित्त शासकीय सुटी!

## » विसर्जन मिरवणुका शांततेत पार पाडा : मुख्यमंत्री

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अनंत चतुर्दशी निमित्त गणेश विसर्जन आणि ईद-ए-मिलादचा सण एकाच दिवशी म्हणजे उद्या गुरुवारी (दि.28) होणार असून गर्दी आणि मिरवणुकांचे योग्य व्यवस्थापन करणे पोलीस प्रशासनास शक्य व्हावे म्हणून शुक्रवार २९ तारखेस शासकीय सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.**

ऑल इंडिया खिलाफत कमिटीच्या शिष्टमंडळाने यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विनंती केली होती.राज्यात शांततेचे वातावरण असावे आणि गर्दी तसेच मिरवणुकांचे नियोजन करता येणे पोलिसांना शक्य व्हावे म्हणून 29 तारखेस सुट्टी देण्याची विनंती त्यांनी केली होती. या शिष्टमंडळात खासदार राहुल शेवाळे, आमदार अबू आझमी, आमदार रईस खान, नसीम खान, आदींचा समावेश होता. अनंत चतुर्दशीनिमित्त राज्याच्या विविध भागात गणेश विसर्जन मिरवणुका आणि ईद ए मिलादनिमित्त मिरवणुका काढण्यात येत असतात. दोन्ही सणांमुळे एकाच दिवशी निघणाऱ्या मिरवणुकांमुळे पोलीस यंत्रणांवर ताण येण्याची शक्यता लक्षात घेऊन 29 सप्टेंबरची सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनंत चतुर्दशीनिमित्त गणरायाला आपण मनोभावे निरोप देऊ. विसर्जन मिरवणुकीतही नेहमीप्रमाणे शिस्त पाळावी आणि शांतता, सद्भावनेच्या वातावरणात गणेश विसर्जन पार पाडावे असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी राज्यातील गणेशभक्तांना केले आहे. गेले दहा दिवस श्री गणेशाच्या आगमनाने मांगल्याचे वातावरण निर्माण झाले. येणाऱ्या काळातही ईद तसेच नवरात्री, दसरा –दिवाळीसारखे सण आहेत. सर्वांनी एकोप्याने आणि भक्तिभावाने हे सण पार पाडावे आणि राज्याची परंपरा अधिक उज्वल करावी असेही मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणतात.



### ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा

» 'ईद-ए-मिलादचे उत्सव पर्व सौहार्द-सलोखा घेऊन येईल. यातून परस्परांतील आदर-प्रेमभाव आणि स्नेह वाढीस लागावा,अशी मनोकामना व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या आहेत. 'प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला त्याग आणि प्रेमाचा संदेश दिला. त्यातून प्रेरणा घेऊन आपण परस्पर आदर-प्रेमभाव वाढीस लावण्याचा प्रयत्न करूया.' असेही आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात पोलिसांनी संपूर्ण राज्यात कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राहील याची काळजी घेतली तसेच एकूणच गणेश मंडळांनी देखील नियमांचे पालन करून सर्वांचा हा आवडता उत्सव आनंदाने पार पाडला त्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. उत्सव साजरा करतांना आपल्याला स्वच्छतेचे महत्व डोळ्याआड करता येणार नाही. स्वच्छ महाराष्ट्राची मोहीम आपण हाती घेतली आहे. 1 ऑक्टोबरला आपण आपली गावे, वॉर्ड कचरामुक्त करणार आहोत. गणेश मंडळांनी देखील विसर्जन आणि त्यानंतर आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्यास प्रशासनाला मदत करावी आणि चांगला संदेश द्यावा असेही मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘आयआयएम’ची शाखा उभारण्याचा संकल्प!

## » भाजपा आमदार महेश लांडगे यांची आग्रही मागणी

### » राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका किंवा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मोकळ्या जागेत ‘आयआयएम’ची शाखा सुरू करावी. त्याद्वारे परिसरातील उद्योग व रोजगार क्षेत्राला चालना द्यावी, अशी आग्रही मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ मध्ये चिखली, तळवडे, रुपीनगर, मोशी, चऱ्होली, दिघी, कुदळवाडी, बोऱ्हाडेवाडी गावांचा समावेश करण्यात आला. मात्र, २०१७ पर्यंत या गावांना पायाभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागले. आम्ही २०१४ मध्ये समाविष्ट गावांच्या विकासाच्या मुद्यावर विधानसभा निवडणूक लढवली. त्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून याच मुद्यावर २०१७ मध्ये आपण महापालिका सार्वत्रिक निवडणूक आणि २०१९ मध्ये विधानसभा व लोकसभा निवडणुकीला सामोरे गेलो. या भागातील लोकांनी आपल्याला मोठी साथ दिली.

२०१७ मध्ये आपल्या नेतृत्त्वाखाली पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून समाविष्ट गावांतील विकासाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने सकारात्मक कार्यवाही सुरू झाले. समाविष्ट गावांतील रस्त्यांचे जाळे, आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, जिल्ह्यातील सर्वात मोठे ८५० बेडचे हॉस्पिटल, आंतराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र, स्केटिंग ग्राउंड, डिअर सफारी पार्क, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकूल असे विविध प्रकल्प मार्गी लावले आहेत, असेही




### जिल्हा प्रशासनाकडून जमिनीची चाचपणी...

» सध्यस्थितीला आयआयएम संस्थेकडून शाखा विस्तारासाठी जागेची पाहणी करण्यात येत आहे. त्यासाठी हवेली तहसिल प्रशासन आणि पुणे विभागीय प्रशासनाकडून शासकीय जागा व गायरान जमिनीच्या उपलब्धतेची चाचपणी सुरू आहे. पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक पट्टा, मुंबई आणि पुणे शहराशी असलेली ‘कनेक्टिव्हीटी’ याचा विचार करुन शहरात आयआयएम शाखा सुरू करणे सोईचे होणार आहे.

“ औद्योगिक शहरात आयआयएम सारखी संस्था सुरू झाल्यास रोजगार आणि उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील. तसेच, पिंपरी-चिंचवडच्या लौकीकात भर पडेल. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त राहुल महिवाल आणि पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी सकारात्मक पुढाकार घ्यावा. तसेच, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयआयएम संस्था प्रशासनाशी चर्चा करुन पिंपरी-चिंचवडमध्ये शाखा विस्तारासाठी सहकार्य कारावे, अशी मागणी केली आहे. त्याला निश्चितपणे सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**– महेश लांडगे,**
**आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

### ‘एज्युकेशन हब’ चा अजेंडा...

» दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या साथीने आम्ही पिंपरी-चिंचवड शहराची ओळख ‘एज्युकेशन हब’ व्हावी. याकरिता प्रयत्न करणार आहोत, असा अजेंडा महापालिका निवडणुकीपूर्वी पिंपरी-चिंचवडकरांसमोर ठेवला होता. त्या अनुसरुन, आपण प्राधिकरण आणि महापालिकेच्या मोकळ्या जागांमध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, राष्ट्रीय कला अकादमी सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. या पुढील काळात पिंपरी-चिंचवड शहराच्या हिताच्या दृष्टीने महाराष्ट्रातील पहिली आणि एकमेव भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची (आयआयएम) शाखा शहरात व्हावी व्हावी, अशी अपेक्षाही आमदार लांडगे यांनी व्यक्त केली आहे.

# चिखलीतील पाणीपुरवठ्यासाठी 15 ऑक्टोबरपर्यंतची "डेडलाईन!

## » राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आसाम भोसरी - चिखली परिसर महापालिकेत समाविष्ट झाल्यापासून मूलभूत सुविधांपासून वंचित होता. येथील समस्यांबाबत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी याचा पाठपुरावा केला आणि आता अजित पवार यांनी सूचना दिल्यानंतर येत्या 15 ऑक्टोबरपर्यंत चिखली येथील पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात येईल. जल शुद्धीकरण केंद्रापासून पंपिंगद्वारे जलवाहिन्यांमधून पाणी टाक्यांपर्यंत नेले जाईल असे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहे. यामुळे चिखलीतील तब्बल दोन लाख नागरिकांना पाणीटंचाईपासून मोठा दिलासा मिळाला आहे. अशी माहिती राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची माहिती दिली.**



पिंपरी चिंचवड शहरातील चिखली हा भाग मोठ्या झपाट्याने वाढला. मात्र त्या तुलनेत मूलभूत सुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत असल्याने येथील ग्रामस्थांनी नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समोर प्रश्नांची जंत्रीच सादर केली. यांनतर दुसऱ्याच दिवशी अजित पवार यांनी बैठक घेतली . या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे ,सामाजिक कार्यकर्ते विकास साने,विकास साने, सुभाष मोरे, काळुराम यादव, सदाशिव नेवाळे, अमृत सोनावणे, नवीन बग, गणेश यादव हे नागरिक व पालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे उपस्थित होते. अजित गव्हाणे म्हणाले, चिखली येथील मुख्यत्वे पाणी प्रश्नाबाबत चर्चा करण्यात आली. चिखली पाटीलनगर येथे महापालिकेने जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. यामध्ये पंपिंगची सुविधा करून येथून चिखली भागासाठी पाईपलाईन द्वारे थेट टाक्यांपर्यंत पाणी पोहोचवले जावे आणि या भागाला पाणीपुरवठा करावा असे नियोजित आहे. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून केवळ पंप बसवला नाही म्हणून या भागाला पाणीपुरवठा अद्यापही सुरू झालेला नाही.

### कोणाचाही फोन येऊ द्या ..

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या बैठकीत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना चिखली, मोशी चौक यांसारख्या भागात वारंवार होणारी वाहतूक कोंडी, चोरी लुटमार यांसारख्या नागरिकांच्या तक्रारीकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे अशा सूचना केल्या. पालिका प्रशासनाने पोलिसांच्या माध्यमातून या भागातील अतिक्रमणे हटवून वाहतूक कोंडीची समस्या सोडवावी असे देखील पवार यांनी सांगितले. कोणत्याही नेत्याचा, पदाधिकाऱ्याचा फोन आला तरी अतिक्रमण कारवाई थांबवायची नाही असे देखील यावेळी पवार यांनी निक्षून सांगितले.

“ चिखली भागातील 800 बेडचे हॉस्पिटल, चिखली शाळा क्रमांक 92 यासाठी क्रीडांगण, पाटीलनगर रस्त्याच्या कामासाठी अडचणीचा ठरत असलेला ट्रान्सफॉर्मर हटवणे आणि अग्निशामक यंत्रणा या प्रस्तावित कामांसाठी वेळेचे नियोजन करा. वेळेवर ही कामे करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्या. गट क्रमांक 1653 आणि 1654 या गायरान जमिनीवरील आरक्षणे तातडीने विकसित करण्यासाठी यंत्रणा कामाला लावा अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिल्या आहेत यामुळे चिखली भागातील समस्यांचा पुढील काळात तातडीने निपटारा होणार आहे.

**– अजित गव्हाणे, शहराध्यक्ष , राष्ट्रवादी काँग्रेस**

# अनंत चतुर्दशीचे महत्व

भाद्रपद शुध्द चतुर्दशीला अनंत चतुर्दशी म्हणत असतात. या दिवशी अनंत म्हणजे विष्णुची पूजा करतात व अनंताचे व्रत करतात. आपल्यावर आलेले संकट दूर व्हावे व आपल्याला पुन्हा वैभव प्राप्त व्हावे म्हणून सतत चौदा वर्षे चौदा गाठी असलेले रेशमी दोरा अनंत मानून त्याची पूजा करून हे व्रत पूर्ण करतात. आपल्या सणावारांचा प्रारंभ प्रतिवर्षी नागपंचमीपासून होतो आणि त्यातील एक पर्व अनंत चतुर्दशीला संपते. अनंत हे एका महानागाचे नाव असले आणि हे नाव जपणे पुण्यकारक मानले जात असले तरी अनंत हे विष्णुचे नाव आहे, हे नजरेआड करता नये. अनंत चतुर्दशीच्या दिवशी विष्णुची 'अनंत' ह्या नावाने पूजा केली जाते. अनंत चतुर्दशीचे व्रत खूप घरातून पाळले जाते. १४ प्रकारची फुले, १४ प्रकारची फळे, १४ प्रकारची धान्ये आणि १४ प्रकारचे नैवेद्य दाखवून एका दोरकासह अनंताची पूजा केली जाते. हा दोरक म्हणजे दोरा अनंत म्हणूनच ओळखला जातो. हा उजव्या हाताच्या मनगटावर बांधतात आणि तो सर्वप्रकारच्या संकटापासून रक्षण करतो, अशी श्रद्धा असते. ह्या व्रताचा विशेष असा की, ही पूजा झाल्यानंतर विसर्जन मागाहून दुस-या दिवशी किंवा गणपती पूजेप्रमाणे दोन, पाच दिवसांनी अशाप्रकारे न करता त्याच दिवशी पूजेनंतर काही वेळाने करण्याची रुढी आहे. हे अनंताचे व्रत १४ वर्षे आचरावे असे सांगितलेले असले तरी अनेक लोक ते आजन्म पाळत असतात. ह्या व्रताची कथा सत्यनारायणाच्याकथेसारखीच आहे. म्हणजे कोणी अडचणीत सापडला असता त्याला दुस-या कोणी तरी अनंताचे व्रत करण्यास सांगितले आणि त्यामुळे त्याचे दुख निवारण झाले. पुढे तो हे व्रताचरण विसरला आणि त्याच्यावर घोर आपत्ती आल्या, अशा स्वरुपाच्या या व्रताच्या कथा आहेत.




नेहमीप्रमाणे ह्या कथेचाही नायक एक ब्राह्मण आहे. त्याच्या पत्नीने एका कन्येला जन्म दिला, तिचे नाव शीला! तिच्या जन्मानंतर ब्राह्मणाची पत्नी दिवंगत झाली. सुमंतुने म्हणजे त्या ब्राह्मणाने दुसरा विवाह केला. ती पत्नी अतिशय कर्कशा होती. पुढे ह्या शीलेचा विवाह कौंडिण्य ऋषीशी झाला. 'निरोप देताना जावयाला काहीतरी देऊ या,' असे सुमंतुने म्हटल्यावर त्याची कर्कशा पत्नी आडवी आली. तिने सुमंतुला ते देऊ दिले नाही. उलट जावयाला आणि लेकीलाही दुरुत्तरे केली. ती पतीबरोबर सासरी जात असताना वाटेत एकेठिकाणी काही स्त्रिया अनंताचे व्रत आचरित असताना तिला दिसल्या. त्या स्त्रियांकडे शीलेने व्रताची चौकशी केली आणि ती त्या दिवसापासून ते व्रत आचरु लागली. व्रताच्या प्रभावाने तिला म्हणजे कौंडिण्याला वैभवाचे दिवस आले. तो खूप श्रीमंत झाला आणि त्याला श्रीमंतीची धुंदी चढली. एके दिवशी त्याने शीलेच्या हातातील अनंताचा दोर तोडून टाकला आणि त्यामुळे अनंत त्याच्यावर रागावला. कौंडिण्याचे सर्व वैभव गेले. त्याला पश्चाताप झाला आणि मग त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहून अनंताने ब्राह्मणरुपात त्याला दर्शन दिले आणि पुन्हा व्रताचरण करण्यास सांगितले. कौंडिण्याला पुन्हा वैभव प्राप्त झाले. ही कथा साधारणपणे आपल्या सत्यनारायणाच्याकथेशी मिळतीजुळती असली तरी सत्यनारायणाच्यापूजेपेक्षा हे व्रत खूपच प्राचीन आहे. सत्यनारायणाची पूजा ही आपल्याकडे अलीकडे आली. अनंत चतुर्दशीचे महत्त्व अधिक वाढविणारा योग म्हणजे गणेशोत्सवातील मूर्तींचे विसर्जन सगळीकडे थाटामाटात केले जाईल.

## गणेश विसर्जन का करावे :-

गणेशजींनी सलग १० दिवस महाभारत लिहिले होते. एका जागी बसल्यामुळे त्यांचे शरीर उष्णतेने जळू लागले होते. हे ज्यावेळी व्यास ऋषींनी पाहिले त्यानंतर वेद व्यासजींनी त्यांना एका जलस्त्रोतावर नेले आणि तेथे पाण्यात स्नान केले. त्यामुळे गणेशजींना मोठा आराम मिळाला. त्या दिवशी अनंत चतुर्दशी होती. त्या दिवसापासून या तिथीला गणेशजींचे विसर्जन करण्याची प्रथा आहे. ज्ञान, बुद्धीची देवता, आणि पाणी, हे देखील ज्ञान आणि शहाणपणाशी संबंधित असल्याचे मानले जाते, याचे कारण स्वतः गणपती बाप्पा आहेत. गणपती बाप्पाची मूर्ती पाण्यात विसर्जित केल्याने, भगवान गणेश शरीरापासून निराकारात विरघळतात. पाणी हे पाच तत्वांपैकी एक मानले गेले असल्यामुळे, ज्यामध्ये प्राणप्रतिष्ठेने स्थापन केलेली गणेशाची मूर्ती मूळ स्वरूपात पाच तत्वांमध्ये विरघळते आणि विलीन होते. असे मानले जाते की, श्री गणेशाने महाभारत लिहिले होते. महर्षी वेद व्यास यांनी सलग १० दिवस गणेशाला महाभारताची कथा सांगितली आणि गणेशाने ही कथा अगदी १० दिवसात लिहून काढली. १० दिवसांनंतर वेद व्यासजींनी गणेशजींना स्पर्श केला, त्यावेळी त्यांच्या शरीराचे तापमान खूप वाढले असल्याचे त्यांना दिसले. वेदव्यासजींनी त्यांना ताबडतोब जलकुंभावर नेले आणि तेथे पाण्यात स्नान केले आणि शरीराचे तापमान शांत केले. त्यावेळी श्री गणेशजींना आराम मिळाला. तेव्हापासून असे मानले जाते की, गणेशाचे विसर्जन त्यांना थंड करण्यासाठी आराम मिळण्यासाठी केले जाते. जीवन हे मृत्यूचे एक चक्र आहे. विसर्जनाचा नियम असे सांगतो की, जग एका चक्राच्या रूपाने फिरत असते, हे माणसाला समजले पाहिजे. या पृथ्वीतलावर जी काही जीवसृष्टी आलेली आहे, ती जीवसृष्टी परत आपल्या जागी जाते. आणि मग जेव्हा वेळ येते त्यावेळी ती पृथ्वीवर परत येते. असे कालचक्र सुरू असते. आपण मोठ्या प्रेमाने बाप्पाची मुर्ती घरी आणतो, नंतर आपण त्याच्या मूर्ती स्वरुपाने मंत्रमुग्ध होतो, पण त्याला जायचे आहे, म्हणजेच गणपती विसर्जन म्हणून त्याचा मोह सोडावा लागतो.



## गणेश विसर्जनाची पद्धत :-

विसर्जनाच्या दिवशी सकाळी नियमितपणे बाप्पाची पूजा करावी. दुपारी आरती ,नैवेद्य दाखवून त्यानंतर संध्याकाळी पुनः पूजा करून शुभ मुहूर्तावर गणरायाला निरोप द्यावा. विसर्जनास न्यायच्यावेळी मूर्ती एखाद्या लाकडी पाटावर ठेवावी. पाटावर ठेवताना आधी रंगोली काढावी. त्यावर पिवळे किंवा लाल रंगाचे कापड पसरून त्यावर स्वस्तिक काढावे. त्यानंतर गणपती बाप्पाला ढोल-ताशांच्या गजरात आनंदाने नदीच्या काठावर,समुद्रावर किंवा तलावाच्या काठावर घेऊन जा. तेथे बाप्पाची पुन्हा आरती करा आणि आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी त्यांच्याकडून आशीर्वाद घ्यावा. आणि बाप्पाला सांगावे, की या वर्षी येऊन तुम्ही ज्या प्रकारे आमच्या आयुष्यात आनंद दिलात, तशाच प्रकारे पुढच्या वर्षीही आमच्या घरी या आणि आमच्याकडून आपली सेवा घडवून आणा. पूजा अर्चा करताना झालेल्या चुकांबद्दल माफी मागावी. नंतर गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषात मूर्ती पाण्यात विसर्जित करावी. भगवान गणेशाच्या जन्मचक्राला सूचित करण्यासाठी हा विधी केला जातो. तो मातीपासून/पृथ्वीपासून निर्माण झालेला त्याचा प्रतीकात्मक पुतळाही आहे. त्यामुळे मूर्ती पाण्यात विसर्जित केली जाते. जेणेकरून गणेश भक्तांच्या घरी किंवा मंदिरात ज्या ठिकाणी गणेश चतुर्थीचा विधी आयोजित केला जातो त्या ठिकाणी 'मुक्काम' केल्यानंतर गणेश आपल्या घरी परत जाईल. हिंदू धर्मात गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता मानतात. सर्व शुभ कार्यात प्रथम गणपतीची पूजा करतात. कारण तो सुखकर्ता, दुःखहर्ता, विघ्नहर्ता आहे.म्हणूनच संकटनाशक देव म्हणून ओळखला जाणारा गणेश, अडथळे दूर करणारा म्हणूनही पूजला जातो . गणेशमूर्ती विसर्जनासाठी बाहेर काढल्यावर घरातील विविध अडथळेही दूर होतात आणि विसर्जनासोबतच हे विघ्नही नष्ट होतात, असा समज आहे. म्हणून गणपती विसर्जन करणे चांगले समजले जाते. सलग १० दिवस महाभारताचे लिखाण करताना श्री गणेशाच्या शरीराचे तापमान खूप वाढले होते.

# भारताच्या अनंतची रुपेरी कामगिरी!

## » नेमबाजीत आणखी एक पदक; स्कीट स्पर्धेत जिंकले रौप्य

नवी दिल्ली ।
महाईन्यूज। वृत्तसंस्था

**आशियाई क्रीडा २०२३ मध्ये भारताची सातत्याने उत्कृष्ट कामगिरी दिसून येत आहे आणि त्यामुळे पदकांची संख्याही वाढत आहे. आता नेमबाजीत अनंतजीत सिंगने पुरुषांच्या स्कीट स्पर्धेत ५८ गुणांसह रौप्यपदक जिंकले आहे. या स्पर्धेत कुवेतच्या अब्दुल्ला अल रशिदीने ६० पैकी ६० गुण मिळवत सुवर्णपदक जिंकले.**



अनंतजित सिंगने ६० पैकी ५८ गुण मिळवले. आशियाई क्रीडा २०२३ मधील नेमबाजीतील भारताचे हे ११वे पदक आहे. मागील आवृत्यांच्या तुलनेत ही आतापर्यंतची सर्वोत्तम शूटिंग कामगिरी आहे. आदल्या दिवशी नेमबाजीत पुरुषांच्या स्कीट सांघिक स्पर्धेत भारताने कांस्यपदक जिंकले होते. यामध्ये भारतीय संघाचा स्कोर ३५५ होता. चीनने सुवर्ण, तर कतारच्या संघाने रौप्यपदक जिंकले. पुरुषांच्या स्कीट एकेरीत भारताने तब्बल ४९ वर्षांनंतर पदक जिंकले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आतापर्यंत २२ पदके जिंकली आहेत. यामध्ये ५ सुवर्ण, ७ रौप्य आणि १० कांस्यपदकांचा समावेश आहे. भारताने १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. २०२३च्या आशियाई खेळांमध्ये नेमबाजीच्या स्पर्धांमध्ये भारताचा दबदबा दिसून आला. मनू भाकर, ईशा सिंग आणि रिदम संगवान यांनी २५ मीटर पिस्तुल सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्यात यश मिळविले. याशिवाय महिलांच्या २५ मीटर पिस्तुल नेमबाजीत ईशा सिंगने रौप्यपदक पटकावले.

देशाला अजूनही नेमबाजीच्या इतर स्पर्धांमध्ये पदक जिंकण्याच्या पूर्ण आशा आहेत. नेमबाजीत भारताच्या सिफ्ट कौर समरा हिने महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये सुवर्णपदक जिंकले. पुरुषांच्या स्कीट एकेरीत भारताने तब्बल ४९ वर्षांनंतर पदक जिंकले आहे. या स्पर्धेत अनंतजित सिंगने चमकदार कामगिरी करत ४९ वर्षांचा दुष्काळ संपवला. आशियाई खेळ २०२३ मध्ये भारताची दमदार कामगिरी सुरू आहे आणि आतापर्यंत देशाने एकूण २२ पदके जिंकली आहेत, ज्यात ५ सुवर्ण, ७ रौप्य आणि १० कांस्य पदकांचा समावेश आहे. १० मीटर एअर रायफल सांघिक स्पर्धेतही भारताने सुवर्णपदक पटकावले. आशियाई क्रीडा २०२३ मध्ये भारताला आज आपल्या नेमबाजांकडून आणखी काही पदकांची अपेक्षा असेल. भारताला स्पर्धेच्या पहिल्या दिवशी पाच, दुसऱ्या दिवशी सहा आणि तिसऱ्या दिवशी तीन पदके मिळाली. एकूण २२ पदकांसह भारत पदकतालिकेत सहाव्या स्थानावर आहे. यामध्ये ५ सुवर्ण, ७ रौप्य आणि १० कांस्य पदकांचा समावेश आहे. आज नेमबाजीत २ सुवर्ण, ३ रौप्य आणि २ कांस्यपदके जिंकली.

### प्रसादने गोल करत आघाडी वाढवली

» अनंतजित सिंगने ६० पैकी ५८ गुण मिळवले. आशियाई क्रीडा २०२३ मधील नेमबाजीतील भारताचे हे ११वे पदक आहे. मागील आवृत्यांच्या तुलनेत ही आतापर्यंतची सर्वोत्तम शूटिंग कामगिरी आहे. आदल्या दिवशी नेमबाजीत पुरुषांच्या स्कीट सांघिक स्पर्धेत भारताने कांस्यपदक जिंकले होते. यामध्ये भारतीय संघाचा स्कोर ३५५ होता. चीनने सुवर्ण, तर कतारच्या संघाने रौप्यपदक जिंकले. पुरुषांच्या स्कीट एकेरीत भारताने तब्बल ४९ वर्षांनंतर पदक जिंकले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आतापर्यंत २२ पदके जिंकली आहेत. यामध्ये ५ सुवर्ण, ७ रौप्य आणि १० कांस्यपदकांचा समावेश आहे. भारताने १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते.

# बाबरच्या आयसीसी रॅंकिंगला धोका!

## » भारतीय सलामीवीर गिल दुसऱ्या क्रमांकावर

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

**पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा फलंदाज म्हणून कायम आहे. भारतीय सलामीवीर शुबमन गिलला अव्वल स्थानावर जाण्याची संधी असताना, तो जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा फलंदाज होण्यापासून वंचित राहिला आहे कारण, त्याला भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या आणि अंतिम वन डेसाठी विश्रांती देण्यात आली आहे.**



### शुबमन गिलची प्रतीक्षा वाढली

» शुबमन गिलने आशिया कप २०२३ मध्ये शानदार पुनरागमन केले. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत तो सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ३ सामन्यांच्या वन डे मालिकेतही त्याने आशिया चषकाची गती कायम ठेवली. तो सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धुमाकूळ घालत आहे. आता गिलला ५ ऑक्टोबरपासून भारतात खेळल्या जाणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकात पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी वाट पाहावी लागणार आहे.

बाबर आझम ८५७ रेटिंग गुणांसह अव्वल तर शुबमन ८४७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. गिलने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये ७४ आणि १०४ धावा केल्या होत्या. जर त्याने आणखी २२ धावा केल्या असत्या तर त्याने बाबरला मागे टाकले असते.

आयसीसीने बुधवारी (२७ सप्टेंबर) जाहीर केलेल्या नवीन क्रमवारीत शुबमन गिलने दुसऱ्या क्रमांकावर आपले स्थान मजबूत केले असून तो आता पहिल्या क्रमांकावर असलेला फलंदाज बाबर आझमच्या जवळ आहे. उजव्या हाताचा फलंदाज शुबमन अलीकडच्या काही आठवड्यांत उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे.

शुबमन गिल आशिया कप २०२३ मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता, जिथे त्याने ७५ पेक्षा जास्त सरासरीने ३०२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या मालिकेतही तो सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. शुबमन गिलने पहिल्या एकदिवसीय सामन्यात ७४ धावा आणि दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात १०४ धावा केल्या आणि तिसऱ्या एकदिवसीय सामन्याला विश्रांती देण्यात आली. दक्षिण आफ्रिकेचा रॅसी व्हॅन डर डुसेन आयसीसी क्रमवारीत शुबमन गिलपेक्षा ७४३ रेटिंग गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

चौथ्या स्थानावर आयर्लंडचा हॅरी टेक्टर ७२९ रेटिंग गुणांसह आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाविरुद्ध चांगली कामगिरी केल्यानंतर श्रेयस अय्यर आणि के.एल. राहुल यानेही आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत प्रगती केली आहे. अय्यरने आठ स्थानांनी प्रगती करत ३०व्या स्थानावर, तर राहुलने सहा स्थानांनी झेप घेत ३३व्या स्थानावर झेप घेतली आहे. अय्यरने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात शानदार शतक झळकावले तर राहुलने पहिल्या दोन वन डेत अर्धशतके झळकावली.

# शाकिब-अल-हसनची बोर्डाकडे अजब मागणी

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

बांगलादेशला (बीसीबी) मोठा धक्का बसणार असे दिसते आहे कारण, त्यांचा अष्टपैलू खेळाडू शाकिब-अल-हसन अवघ्या महिन्यापूर्वी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर एकदिवसीय संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार होऊ इच्छित आहे. विश्वचषकापूर्वी बांगलादेशचे दोन महान क्रिकेटपटू तमीम इक्बाल आणि शाकिब-अल-हसन यांच्यात नवीन मतभेद निर्माण झाल्याच्या बातम्या येत आहेत. बांगलादेश क्रिकेट बोर्डने (BCB) आशिया चषक २०२३ पूर्वी शाकिब-अल-हसनला एकदिवसीय संघाचा कर्णधार म्हणून घोषित केले आणि तो ५० षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत 'बांगला टायगर्स'चे नेतृत्व करण्यास सज्ज आहे. नुकत्याच निवड झालेल्या १५ सदस्यीय विश्वचषक संघाचे नेतृत्व हे शाकिबकडे सोपवण्यात आले असून काही महिन्यांपूर्वी निवृत्ती मागे घेणाऱ्या तमीम इक्बालला वगळले आहे. त्यामुळे बांगलादेश क्रिकेटमध्ये एक नवे संकट उभे ठाकले आहे. बीसीबीच्या एका सूत्राने डेली स्टारला सांगितले की, शाकिबने देशाच्या क्रिकेट प्रशासकीय समितीला कळवले आहे की प्रतिष्ठित स्पर्धेत संघाचे नेतृत्व करण्याचा त्याचा इरादा नाही. ३६ वर्षीय बांगलादेशचे मुख्य प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघा यांच्यासमवेत मध्यरात्री बीसीबी अध्यक्ष नजमुल हसन यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि त्यांची परिस्थिती समजावून घेतली. तमीम इक्बाल पाठीच्या दुखापतीने त्रस्त आहे पण विश्वचषकासाठी बांगलादेशच्या १५ सदस्यीय संघात त्याचा समावेश करण्यात येणार होता पण शाकिबच्या दबावामुळे त्याला वगळण्यात आले आहे. बांगलादेशच्या दोन सर्वोत्तम क्रिकेटपटूंमध्ये हे संभाव्य शीतयुद्ध सुरूच आहे. त्यांच्यात तणाव निर्माण होण्याची ही पहिलीच वेळ नाही.